# राज्यशास्त्र विभाग अहवाल

दिनांक २५ / ०१ / २०१९

(राष्ट्रीय मतदार दिवस)

"समाजश्री प्रशांतदादा हिरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपुर येथे "**चला सक्षम मतदार होऊया**" विषयावर व्याख्यान संपन्न.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपुर येथे आय.क्यू.ए.सी. आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "जीवन कौशल्य" कार्यक्रमांतर्गत "चला सक्षम मतदार होऊया" या विषयावर महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय येथील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. सी. डी. राजपूत यांनी व्याख्यान दिले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे होते.

प्रा. डॉ. सी. डी. राजपूत यांनी आपल्या व्याख्यानात मतदानाचे महत्त्व विशद केले. सुदृढ आणि सक्षम लोकशाहीसाठी मतदान प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते, भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो, अशावेळी वय वर्ष अठरा पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

तसेच भारतीय निवडणुकांचा ऐतिहासिक घटनाक्रम त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एन. डी. पगार यांनी विभागाद्वारे विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. "चला

सक्षम मतदार होऊया" या उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. आर. क्षीरसागर यांनी केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.





("जीवन कौशल्य" कार्यक्रमांतर्गत "चला सक्षम मतदार होऊया" या विषयावर व्याखान देताना प्रा. डॉ. सी. डी. राजपूत)